



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ०८१ ● पुणे ● बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




गोपाळ विठ्ठल यांची जीएसएमए बोर्डाच्या कार्यवाहक अध्यक्षपदी नियुक्ती 3



नवमूत्रमार्ग, कृत्रिम स्नायू प्रस्थापित करून तरुणीचे जीवन आनंदी व पूर्ववत 4

## ठळक बातम्या

### ५० हून अधिक वाहनांची तोडफोड

पुणे (आरंभ पर्व) : बिबेवाडीतील अप्पर इंदिरानगर परिसरात टोळक्याने दहशत माजवून वाहनांची तोडफोड केल्याची घटना मध्यरात्री घडली. टोळक्याने ५० पेक्षा जास्त वाहनांची तोडफोड केल्याने रहिवाशांमध्ये घबराट उडाली. अप्पर इंदिरानगर परिसरातील दुर्गा माता मंदिर परिसरात मध्यरात्री आलेल्या टोळक्याने रस्त्याच्या कडेला लावलेल्या दुचाकी, टेम्पो, रिक्षांची दांडक्याने तोडफोड केली. टोळक्याने शिवीगाळ करुन दहशत माजविली. वाहन तोडफोडीचा आवाज ऐकल्यानंतर नागरिकांनी आरडाओरडा केला. टोळके तेथून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच बिबवेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

### पाण्याच्या तपासणीतून धक्कादायक निष्कर्ष

पुणे (आरंभ पर्व) : नांदेड गाव परिसरात गुइलेन बॅरे सिंड्रोमचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे आरोग्य विभागाने या भागातील ६२ रुग्णांच्या घरातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले होते. त्यात २६ रुग्णांच्या घरातील पाण्यामध्ये क्लोरिनचे प्रमाण शून्य आढळून आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या घरापर्यंत पाण्यात क्लोरिनचे योग्य प्रमाण राहील, याची खबरदारी घेण्याचे निर्देश आरोग्य विभागाने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला दिले आहेत. पुणे विभागात जीबीएसचे १६३ रुग्ण आहेत. त्यांपैकी नांदेडगावच्या ५ किलोमीटर परिसरात ७७ रुग्ण आहेत. उर्वरित रुग्ण पुण्याच्या इतर भागांतील आहेत. त्यामुळे नांदेडगाव परिसरात या आजाराचा उद्रेक दिसून येत आहे. आरोग्य विभागाने नांदेडगाव परिसरातील ६२ रुग्णांच्या घरी भेट देऊन पाण्याच्या स्रोताची माहिती घेतली. त्यात पाण्याच्या स्रोतांच्या ठिकाणी पाणी शुद्धीकरण आणि त्यात पुरेशा प्रमाणात क्लोरिन आढळून आले. मात्र, २६ रुग्णांच्या घरातील पाण्यामध्ये क्लोरिनचे प्रमाण शून्य आढळून आले. यामुळे पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाला पाण्यात क्लोरिनची मात्रा वाढविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलद प्रतिसाद पथकाचे अध्यक्ष व आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिली.

### १०० जणांनी थकविले मिळकतकराचे ३३४ कोटी रुपये

पुणे (आरंभ पर्व) : मिळकतकर विभागाकडून थकबाकी वसूल करताना दुजाभाव केला जात असल्याचा आरोप केल्यानंतर आज (ता. ४) प्रशासनाने शहरातील पहिल्या १०० थकबाकीदारांची यादी जाहीर केली आहे. या थकबाकीदारांनी ३३४.१० कोटी रुपये थकविले आहेत. यामध्ये सर्वात मोठ्या थकबाकीदाराची रक्कम ही १८ कोटी ४४ लाख रुपये इतकी आहे. पुणे महापालिकेने उत्पन्न वाढविण्यासाठी मिळकतकर विभागाला विशेष मोहिम हाती घेण्याचे आदेश दिले आहेत.

# पुण्यातील खासगी रुग्णालयांकडून नियम धाब्यावर !

## आरोग्य विभागाकडून कारवाईचे पाऊल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खासगी रुग्णालयांच्या विरोधात तक्रारी वाढल्याने राज्य पातळीवर खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने आतापर्यंत सुमारे ७१४ खासगी रुग्णालयांची तपासणी केली आहे. यात तब्बल १० टक्के रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याचे समोर आले असून, त्यांना नोटीस बजाविण्यात आली आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी सुरू आहे. आरोग्य विभागाने महिनाभरात सुमारे ७१४ रुग्णालयांची तपासणी केली. त्यात ७६ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याची बाब निदर्शनास आली.

या रुग्णालयांना आरोग्य विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का, याची तपासणी केली जात आहे. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करण्यात येत आहे. रुग्णालयाकडील अग्निशामक दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घेतली जात आहे, अशी माहिती सहायक आरोग्य अधिकारी सूर्यकांत देवकर यांनी दिली.



आरोग्य विभागाच्या तपासणी मोहिमेत खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि किमान एक रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयांचा समावेश आहे.

याचबरोबर ॲलोपथी, आयुष, युनानी, नॅचरोपथी यासह सर्व शाखांच्या रुग्णालयांची तपासणी केली जात आहे. रुग्ण २४ तास दाखल करून घेतला जात नाही, अशा डे केअर सेंटरचा यात समावेश नाही. महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात क्षेत्रीय आरोग्य अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी अशा तीन जणांच्या पथकावर तपासणीची जबाबदारी सोपविली आहे. शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांत अशी १५ पथके रुग्णालयांची तपासणी करीत आहेत.

नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांना नोटीस बजावून एक महिन्याचा कालावधी सुधारणा करण्यासाठी देण्यात आला आहे. काही रुग्णालयांनी या नोटिशीला उत्तर देऊन सुधारणा केल्याचे आरोग्य विभागाला कळविले आहे. एक महिना पूर्ण झाल्यानंतर आरोग्य विभागाकडून नोटीस पाठविलेल्या रुग्णालयांची तपासणी करून सुधारणा झाल्याची खात्री केली जाणार आहे. रुग्णालयांनी सुधारणा केली नसल्यास त्यानंतर त्यांच्यावर कारवाईचे पाऊल आरोग्य विभाग उचलणार आहे.

> **महापालिकेककडून खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम सुरू असून, उपचारांचे दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, रुग्ण हक्क संहिता नसणे यांसह इतर नियमांचे पालन होत नसल्याचे काही ठिकाणी निदर्शनास आले. याप्रकरणी ७६ रुग्णालयांना नोटीस बजाविण्यात आली आहे.**
> **- डॉ. सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, महापालिका**

# खून करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या आवळल्या

**आळेफाटा (दै. आरंभ पर्व)**

प्रवासाचे बहाण्याने इरटीका कारमध्ये बसून कारचालकास मारहाण करत त्यांचा खून करणाऱ्या सराईत आंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या आवळल्या. याबाबत आळेफाटा पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकुश राजेश गायकवाड (वय-३० वर्षे), रा. निधी अपार्टमेंट जेलरोड, नाशिक यांनी त्यांचे वडील राजेश बाबुराव गायकवाड (वय-५६ वर्षे) व्यवसाय चालक रा. सदर हे दि. २७/०१/२०२५ रोजी नाशिक येथून त्यांचे ताब्यातील इरटीगा कार नं. एम.एच. १५ जे.डी. ५१९३ ही घेवून पुणे येथे गेले होते. रात्री साडेदहाच्या सुमारास राजेश गायकवाड यांचे फोनवरून आईला आला की, राजेश गायकवाड यांचा फोन



पुणे-नाशिक हायवेलगत संतवाडी रोडवर मिळाला असून फोन समाधान हॉटेल येथे आहे. या माहितीचे आधारे फिर्यादी व कुटुंबीय हे आळेफाटा येथे आले त्यांनी राजेश गायकवाड यांचा शोध घेतला, ते मिळून न आल्याने दि.२८ रोजी हरवल्याची फिर्याद अंकुश गायकवाड यांनी नोंदवली होती.त्यानंतर आळेफाटा पोलिसांनी तपास चालु केला असता त्यांना संतवाडी परिसरात राजेश बाबुराव गायकवाड (वय-५६ वर्षे) व्यवसाय चालक यांचा मृतदेह आढळल्याने अनोळखी व्यक्ती विरोधात खूनाचा गुन्हा नोंदविणेत आला होता. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याचे अनुषंगाने पुणे ग्रामीण चे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी स्था. गु. शा. चे पथकास योग्य ते मार्गदर्शन करून सुचना केल्या होत्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी पथकास सुचना करून सीसीटीव्ही फुटेज तपासुन तपास पथकाचे मदतीने तपास सुरू करून मृतदेह मिळून आलेल्या रोडवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, नाशिक ते पुणे लेनलगतचे हॉटेलच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये मयत राजेश गायकवाड यांचेकडील इरटीका कार ही विरूद्ध दिशेने येवून मृतदेह मिळून आलेल्या ठिकाणी गेली व पुन्हा मागे आळेफाटा बाजूकडे जावून माळशेज घाटाकडे गेली होती.

# राहुल सोलापूरकरांनी अखेर व्यक्त केली दिलगिरी!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचं दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी अखेर माफी मागितली आहे. आपला शिवरायांचा अपमान करण्याचा कुठलाही हेतू नव्हता. फक्त आपण इतिहास कशा रंजक पद्धतीनं सांगितला जातो, एवढचं माझा सांगण्याचा प्रयत्न होता. पण यामुळं कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो असं विधान राहुल सोलापूरकर यांनी केलं आहे. एका व्हिडिओ संदेशाद्वारे त्यांनी दिलगिरी व्यक्त करताना आपली भूमिका सविस्तरपणए मांडली. राहुल सोलापूरकर व्हिडिओ संदेशात म्हणतात, "नमस्कार, छत्रपती शिवाजी महाराज की जय! मी अभिनेता राहुल सोलापूरकर. साधारण दीड-दोन महिन्यांपूर्वी रीमा अमरापूरकर यांच्या पॉडकास्टमध्ये मी साधारण ५० मिनिटं मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीदरम्यान एका प्रश्नाला उत्तर देताना मी इतिहास आणि इतिहासातील रंजक गोष्टी कशा बनतात याविषयी बोलताना छत्रपती शिवरायांची आग्र्याहून सुटका यावर काही बोललो. यामध्ये बिकानेरच्या राजवाड्यातील काही पुरावे, राजस्थानची काही कागदपत्रं, फारसी, उर्दू अशा ग्रंथांमधले आणि औरंगजेबाच्या जवळच्या माणसांच्या काही गोष्टी ज्या काही मला वाचायला, अभ्यासाला मिळालेल्या होत्या त्यातील कोही गोष्टी मी बोललो.









# रेल्वेच्या प्रकल्पांना वैष्णवांचा बुस्टर डोस

मुंबईकरांची लाईफलाईन असलेली मुंबई लोकल आता सुपरफास्ट आणि आलिशान होणार आहे. या लोकल सेवेत लवकरच नवे आणि प्रवाशांच्या पसंतीला येतील असे बदल करण्याची भूमिका रेल्वे मंत्रालयाने घेतली आहे. त्यातूनच खचाखच भरलेल्या डब्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी पुरेसे ऑक्सिजन मिळू शकेल अशा पद्धतीची रचना असणारे नवे डबे सेवेत आणले जातील. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास मोकळा होऊ शकेल. या बदलासोबतच मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावर नवे टर्मिनल उभारण्यासह उपनगरीय रेल्वे सेवेत नवे बदल होणार आहेत, असे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. वैष्णव यांनी दिलेल्या माहितीमुळे दररोज लोकलने प्रवास करणारे सुमारे ७५ लाख प्रवासी निश्चितच सुखावतील.

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी २३ हजार ७७८ कोटींची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये एक लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.

गेल्या साडेदहा वर्षांमध्ये मोदी सरकारच्या कार्यकाळात दोन हजार १०५ कि.मी. लांबीचे नवे रेल्वे मार्ग टाकण्यात आले. त्यातील तीन हजार ५८६ कि.मी.सह शंभर टक्के विद्युतीकरण झाले आहे. सध्या महाराष्ट्रात एक लाख ५८ हजार ८६६ कोटींच्या चार नव्या प्रकल्पांसह सहा हजार ९८५ किमीच्या एकूण ४७ प्रकल्पांची कामे सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सोमवारी दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत दिली आहे.

मुंबई लोकलच्या सुधारणासाठी नवीन कोणत्या गोष्टी समोर आल्या, तर मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी १६ हजार ४०० कोटी खर्चून ३०१ किलोमीटर लांबीच्या रेल्वे प्रकल्पांची कामे सुरू आहेत. प्रवाशांचा प्रवास वेळ वाचवण्यासाठी लोकलचा वेग वाढविण्याचा निर्णय मध्य रेल्वेने गेल्या वर्षी घेतला होता. त्यानुसार आता लोकलचा वेग वाढविण्याचे काम करण्यात येत आहे. दोन लोकलमधील वेळ कमी करण्याचा विचार असल्याचे अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दोन लोकलमधील वेळ



१८० सेकंदाचा आहे, त्याला आधी १५० सेकंद करण्यात येईल. त्यानंतर हा वेळ १२० सेकंदांवर आणला जाणार आहे. त्याशिवाय गर्दी कमी करण्यासाठी लोकल वाढविण्यात येणार आहेत, मुंबईत सध्या दररोज ३ हजार गाड्या धावत असून त्यात आणखी ३०० गाड्यांची भर घालण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. लोकलच्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तिन्ही मार्गांवर लोकलला कवच प्रणालीबरोबरच कम्बाइन कम्युनिकेशन बेस्ड ट्रेन कंट्रोल सीबीटीसी यंत्रणा जोडली जाणार आहे.

मुंबईबरोबर महाराष्ट्रात रेल्वेचे जाळे वाढवण्याचा भारतीय रेल्वेचा प्रयत्न दिसून आला आहे. पाच हजार ५८७ कोटी रुपये खर्चून राज्यातील १३२ अमृत स्थानके विकसित केली जाणार आहेत.


महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांमध्ये ११ वंदे भारत धावत आहेत. नागपूर रेल्वे स्थानकाच्या ५८९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या पूर्व भागाच्या इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे. त्याचप्रमाणे ३६० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या नागपुरातील अजनी रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागाचे, एक हजार ८१३ कोटी खर्चाच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे, ३५९ कोटी खर्चाच्या छत्रपती संभाजीनगर स्थानकाच्या दक्षिण भागाच्या इमारतीचे आणि १८२ कोटी खर्चाच्या जालना स्थानकाच्या इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे. यापूर्वी २००९-१४ या काळात महाराष्ट्राला वर्षाला सरासरी १ हजार १७१ कोटी रुपये रेल्वे बजेटमध्ये मिळायचे. यंदा एकाच वर्षातील तरतूद ही तब्बल २० पटींनी अधिक आहे. २०१४ ते २०२५ या दरम्यान राज्यात दरवर्षी सरासरी १९१ किलोमीटर्सचे नवे रेल्वे मार्ग विकसित केले गेले आहेत. हे प्रमाण यापूर्वीच केवळ दरवर्षी सरासरी ५८ किलोमीटर इतके होते. २००९-१४ या कालावधीत एकाही मार्गाचे विद्युतीकरण झाले नव्हते. त्यानंतर २०१४ ते २०२५ या काळात दरवर्षी सरासरी ३२६ किलोमीटर्स मार्गाचे विद्युतीकरण करण्यात आले. यामुळे महाराष्ट्रातील ३ हजार ५८६ म्हणजेच पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे. याच कालावधीत महाराष्ट्रात २ हजार १०५ किलो मीटर्सचे नवे रेल्वे मार्ग बांधण्यात आले.

तुलनाच करायची झाल्यास ही लांबी मलेशियातील आता अस्तित्वात असलेल्या संपूर्ण रेल्वे मार्गाच्या लांबी इतकी होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या आतापर्यंतच्या वाटचालीत रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व अशी वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. माल वाहतूक सुविधा सहज सुलभ आणि मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. या सगळ्यातून महाराष्ट्र हे रेल्वेच्या नकाशावरील सशक्त आणि सदृढ राज्य बनले आहे. त्याचप्रमाणे, पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात, उत्तर प्रदेशातील रेल्वे बजेटमध्ये १८ पट वाढ झाली, गेल्या १० वर्षांत यूपीमध्ये ५,२०० किमी नवीन रेल्वे ट्रॅक टाकण्यात आले. जो संपूर्ण स्वित्झर्लंड किंवा बेल्जियमच्या रेल्वे ट्रॅकच्या लांबीपेक्षा जास्त आहे. येत्या वर्षभरात प्रवाशांच्या आरामदायी प्रवासासाठी १७,५०० नॉन-वातानुकूलित जनरल कोच तयार केले जाणार आहेत. ५० नमो भारत ट्रेन, आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या १०० वातानुकूलित अमृत भारत गाड्या आणि २०० वंदे भारत गाड्या तयार केल्या जात आहेत. अन्नाची गुणवत्ता सुधारण्यासाठी ६०० बेस्ट किचन सुरू केले जाणार आहेत. कमी अंतर असलेल्या दोन शहरांमध्ये धावणाऱ्या नमो भारत गाड्यांच्या संख्येतही आणखी ५० गाड्यांची भर पडणार आहे, तर श्रमिक वर्गासाठी आणखी १०० अमृत भारत गाड्या सुरू करण्यात येणार आहेत. वंदे भारतच्या २०० नव्या गाड्यांच्या निर्मितीचे काम सुरू आहे. हे सर्व पाहता, रेल्वेच्या प्रकल्पांना रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णवांकडून बुस्टर डोस दिला जात असल्याचे दिसून येत आहे.

# एल अँड टी फायनान्स लिमिटेड तर्फे प्रस्तुत 'नॉलेजेबल एआय (KAI)'

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'एल अँड टी फायनान्स लिमिटेड' (एलटीएफ) या आघाडीच्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीने (एनबीएफसी) आपल्या नव्याने पुर्नरचना केलेल्या कॉर्पोरेट संकेतस्थळावर 'नॉलेजेबल एआय' (KAI) हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स व्हर्च्युअल अॅडव्हायजर लॉंच केला असून त्याद्वारे कंपनी गृहकर्ज घेण्याच्या ग्राहकांच्या अनुभवात परिवर्तन घडवले आहे. 'KAI'चे उद्घाटन सुरवातीला कंपनीच्या 'RAISE' 24' या कार्यक्रमात झाले होते. गृहकर्ज प्रवास सुसूत्रित व वैयक्तिक बनवण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा योग्य वापर यातून दिसून येतो. ग्राहकांना सक्षम करणारी आणि गृहकर्ज घेण्याची बहुदा-क्लिष्ट प्रक्रिया




सोपी करणारी आधुनिक सोल्यूशन्स पुरवण्याची 'एलटीएफ'ची बांधीलकी या अभिनवतेमधून अधोरेखित होते. जटिल परिभाषा, किचकट आकडेमोड आणि दीर्घ अर्ज प्रक्रिया अशा आव्हानांचा मुकाबला करण्याच्या हेतूने रचना केलेला 'KAI' खासकरुन प्रथमच कर्ज घेणाऱ्यांच्या गरजांची पूर्तता करतो आणि घरमालकीपर्यंतचा प्रवास सुखावह व अधिक सुलभ बनवतो. संभाव्य गृहखरेदीदारांना हा अॅडव्हायजर अंतःप्रेरणात्मक, कार्यक्षम व वापरास मैत्रीपूर्ण अनुभव देतो, तसेच तत्काळ साह्य व तज्ज्ञांचे मार्गदर्शन वेगाने पुरवतो.

'KAI' प्रगत अशा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करतो ज्यात प्रत्येक वापरकर्त्याच्या विशिष्ट गरजा समजून घेण्यासाठी खास असे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) समाविष्ट आहे. त्यामुळे 'KAI'ला समकृत मासिक हप्त्यांची (इएमआय) आकडेमोड व कर्जाचा अंदाज पुरवण्याची, तुमच्या गृहकर्जविषयक प्रश्नांना तज्ज्ञ उत्तरे देण्याची आणि संदर्भ व मार्गदर्शन पुरवण्याची तसेच निव्वळ चॅटबॉटपेक्षा गृहकर्ज मार्गदर्शकाची भूमिका बजावण्याची मुभा मिळते. यासंदर्भात 'एलटीएफ'चे मैनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री सुदीप्ता रॉय म्हणाले, "ग्राहक संपर्क सुधारण्याच्या आणि वित्तीय प्रक्रियांचे सुसूत्रीकरण करण्याच्या आमच्या समर्पिततेचा पुरावा असणारा 'KAI' सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. 'KAI' द्वारा आम्ही केवळ एक चॅटबॉट सादर करत नसून संभाव्य गृहखरेदीदारांना बहुदा-संभ्रमित करणाऱ्या गृहकर्ज प्रक्रियेत अचूक दिशादर्शनासाठी मदत करणारा व्यक्तिगत व अखंड मार्गदर्शक देऊ करत आहोत. गृहखरेदी प्रवास सोपा, कार्यक्षम व प्रवेशसुलभ बनवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. 'KAI' चे आगळेपण म्हणजे तो 'एलटीएफ'च्या गृहकर्जांशी संबंधित विशिष्ट शंकांना केवळ तत्काळ प्रतिसादच पुरवत नसून गृहकर्ज संबंधित इतरही विविध मुद्यांवर मार्गदर्शन करतो." 'KAI' हा चॅटबॉटच्या प्राथमिक कार्यक्षमतांपलिकडे जाऊन 'एलटीएफ' कंपनीच्या कागदपत्रांमधून (अत्याधुनिक RAG तंत्रज्ञान वापरुन) माहिती प्राप्त करतो आणि संवादात्मक स्लायडर्स वापरुन सहजपणे इएमआय आकडेमोड करुन देतो. वापरकर्ते सोईस्कर रीतीने इएमआय वेळापत्रक डाऊनलोड करु शकतात आणि त्यांच्या पसंतीच्या पर्यायावर शोधखूण (बुकमार्क) नोंदवू शकतात.

'KAI' संभाषणात्मक शैलीत उत्तरे पुरवतो, ती उत्तरे वापरकर्त्यांच्या विशाल समूहाला समजण्यास सोपी करतो, तसेच तो पाठपुरावा करणारे ग्राहकांचे प्रश्नही अखंड हाताळत व्यापक व वापरास मैत्रीपूर्ण अनुभव मिळवून देतो.

# थोडक्यात



## केंद्रीय कार्य समिती सदस्यपदी जावेद इनामदार यांची नियुक्ती

**पुणे (आरंभ पर्व) :** राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या (अजित पवार गट) केंद्रीय कार्य समितीच्या सदस्यपदी जावेद इनामदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महासचिव अविनाश आदिक यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा राष्ट्रीय युवक अध्यक्ष धीरजभैय्या शर्मा यांनी केली. जावेद इनामदार यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, जिलानी शेख, जानकी पांडे, बिष्णु दास यांचा केंद्रीय कार्य समितीमध्ये समावेश आहे. धीरजभैय्या शर्मा यांनी जावेद इनामदार यांच्या नियुक्तीचे पत्र दिले व त्यांचे अभिनंदन करून पक्षवाढीसाठी काम करण्यास शुभेच्छा दिल्या. जावेद इनामदार म्हणाले, "माननीय अजित पवार यांच्या मार्गदर्शनात व धीरजभैय्या शर्मा यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून आजवर काम केले आहे. विकासाच्या वाटेने चालणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला युवकांमध्ये ताकदीने घेऊन जाण्याचा प्रयत्न यापुढील काळात करणार आहे. पक्षाला जनमानसात रुजवण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे."

## चारचाकीवाल्या 'लाडक्या बहिणींची' यादीच काढली

**पुणे (आरंभ पर्व) :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांच्या पडताळणीसाठी जिल्हा परिषदेकडे चारचाकीवाल्या 'बहिणीं'ची यादी आली आहे. शासनाकडून आलेल्या यादीमध्ये पुणे जिल्ह्यातील ७५ हजार १०० लाभार्थी महिलांच्या किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे चारचाकी वाहन असल्याचे निष्पन्न झाले आहे. या यादीनुसार आता अंगणवाडी सेविका 'बहिणीं'च्या घरी जाऊन पडताळणी करणार आहेत. राज्य शासनाकडून प्रत्येक परिवहन विभागाकडून यादी घेऊन ती जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आली. या याद्यांनुसार प्रत्येक जिल्ह्यात बाल विकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ), पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका घरोघर जाऊन पडताळणी करणार आहेत. पुणे जिल्ह्यासाठीच्या दोन याद्या जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे आल्या आहेत. त्यातील पहिल्या यादीत ५८ हजार ३५०, तर दुसऱ्या यादीत १६ हजार ७५० अशी एकूण ७५ हजार १०० वाहनधारकांची यादी प्रशासनाला मिळाली आहे.

# सामूहिक विवाह सोहळे आजच्या काळाची गरज : गोयल

- **मोफत विवाहसाठी नोंदणी करण्याचे आवाहन**
- **पुण्यात होणार १५ मार्च २०२५ ला भव्य बिगर हुंडा भव्य सामूहिक विवाह सोहळा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या काळात जास्तीत जास्त सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहेत. कारण यामुळे विवाह समारंभांमध्ये होणारा खर्च मोठ्या प्रमाणात वाचतो. सामूहिक विवाह सोहळे आज समाजासाठी एक प्रेरणास्रोत बनले आहेत. या अनुषंगानेच अग्रसेन भगवान चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दि. १५ मार्च २००५ रोजी गरीब आणि गरजू कुटुंबातील युवक-युवतींसाठी एक बिगर हुंडा सामूहिक विवाह समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील सुप्रसिद्ध समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित हा विवाह सोहळा अगदी थाटात हिंदू धर्मातील रितीरिवाजानुसार तथा धार्मिक परंपरेनुसार होणार आहे. या सोहळ्यात लग्न करणाऱ्या जोडप्यांना लाखो रुपयांच्या संसारोपयोगी वस्तू दिल्या जातील. गरीब आणि गरजू विवाहेच्छुक जोडप्यांनी या सोहळ्यासाठी लवकरात लवकर मोफत नोंदणी करावी, असे आवाहन रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांनी केले आहे.

या समारोहासंदर्भात माहिती देताना रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, आज आपण अशी अनेक कुटुंबे पाहतो जिथे घरात लग्न झाल्यानंतर माता-पिता हे कर्जामध्ये बुडतात. कुठल्याही माता-पित्यावर ही स्थिती येऊ नये, यासाठी सामूहिक विवाह समारोह ही आजच्या काळाची गरज बनले आहेत आणि हीच खरी मानव सेवा आहे.

# अॅग्रीस्टॅक फार्मर आयडीसाठी जनजागृती फेरी

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील खेड तहसील कार्यालयाच्या वतीने अॅग्रीस्टॅक फार्मर आयडी काढण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती व्हावी, यासाठी मंगळवारी (दि. ४) राजगुरुनगर शहरातुन जनजागृती फेरी काढण्यात आली.

या फेरीची सुरुवात राजगुरुनगर एसटी बस स्थानकाजवळील हुतात्मा शिवराम हरी राजगुरु, भगतसिंग, सुखदेव यांच्या पुतळ्याला तहसिलदार ज्योती देवरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पन करुन करण्यात आली.

या फेरीमध्ये तहसिलदार ज्योती देवरे, नायब तहसिलदार मदन जोगदंड, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, केंद्रप्रमुख द.मा पिंगळे, तलाठी दिपक जाधव, निलेश घोडके, महात्मा गांधी विद्यालय, हुतात्मा राजगुरु विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ व २, या शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थीनी, खेड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, एसटी महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी सर्व महसुल कर्मचारी, खेड पंचायत समितीचे कर्मचारी, शिक्षक, विविध संघटनाचे पदाधिकारी, शेतकरी व नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. फेरी एसटी बसस्थानकापासुन मुख्य बाजारपेठ मार्गे तहसिलदार कचेरी व वाडारस्ता येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत नेण्यात आली व या ठिकाणी फेरीचा समारोप करण्यात आला.

दरम्यान या वेळी अनेक विद्यार्थी, व कर्मचारी यांनी शेतकरी वेषभुषा परिधान केलेल्या होत्या. स्वतः तहसिलदार ज्योती देवरे यांच्यासह शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली पारंपारीक वेषभुषा या फेरीचे आकर्षण ठरले. वेळी विद्यार्थांनी शेतकरी गीतावर ठेका धरत जनजागृती फेरीत रंगत आणली. याप्रसंगी बोलताना तहसिलदार ज्योती देवरे यांनी सांगितले कि, केंद्रशासन व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने फार्मर आयडी (शेतकरी ओळखपत्र) काढण्याचे काम करु करण्यात आले असुन सर्व शेतक-यांनी आपले फार्मर आयडी काढुन घ्यावे. हा उपक्रम शेतकऱ्यांना फायदेशीर असून विविध योजना व उपक्रमांसाठी महत्वाचा दुवा ठरणार आहे.

खेड तालुक्यातील सुमारे अकरा हजार शेतक-यांनी आपले शेतकरी आयडी काढले आहे. लवकरच सर्व शेतक-यांनी आपले फार्मर आयडी काढुन घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# एएसी वॉल पॅनल्स- भिंतींच्या बांधकामातील नवीनतम प्रगती

- **या आवृत्तीचे आयोजन २१,०७८ चौरस मीटर क्षेत्रात करण्यात आले आहे. यात ४५० पेक्षा अधिक बूथ असून, १५,००० पेक्षा जास्त व्यावसायिक प्रतिनिधींचा सहभाग आहे.**




**कॉन्स्ट्रो २०२५ हा बांधकाम उद्योगातील प्रमुख व्यावसायिकांना एकत्रित आणण्यासाठी तयार करण्यात आलेला एक महत्वपूर्ण मंच आहे. जिथे डेव्हलपर्स, वास्तुशिल्पज्ञ, कंत्राटदार आणि पायाभूत सुविधा तज्ज्ञ एकत्र येतात. पुण्यातील झपाट्याने होत असलेले शहरीकरण आणि पर्यावरणपूरक तसेच उच्च-कार्यक्षम इमारत साहित्यांची वाढती मागणी लक्षात घेता, मॅजिक्रेटने अत्याधुनिक एएसी पॅनल्स प्रदर्शित केले आहे. हे पॅनल्स जलद, किफायतशीर आणि ऊर्जेची बचत करीत भरभक्कम बांधकामाला चालना देतात.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एएसी ब्लॉक्स, बांधकाम रसायने आणि प्रीकास्ट सोल्यूशन्समध्ये आघाडीवर असलेल्या मॅजिक्रेट कंपनीने कॉन्स्ट्रो २०२५ च्या १९ व्या आवृत्तीमध्ये आपल्या अत्याधुनिक अशा एएसी वॉल पॅनल्स प्रदर्शित केल्या. पुणे येथील इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर येथे ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनातील बूथ क्रमांक ई-15 येथे मॅजिक्रेटने या अत्याधुनिक एएसी वॉल पॅनल्स प्रदर्शित केल्या. या नवीनतम वॉल पॅनल्सच्या प्रभावी कार्यक्षमतेमुळे बांधकाम प्रक्रिया किफायतशीर आणि पर्यावरणपूरक होणार आहे. याशिवाय मजुरीची लागत कमी होऊन बांधकाम देखील जलदरित्या पूर्ण होण्यास मदत होणार आहे. मॅजिक्रेटने आपल्या सर्व उत्पादनांमध्ये आधुनिक बांधकाम पद्धती, टिकाऊपणा आणि नाविन्यपूर्ण कल्पना यावर भर दिला आहे. जे या प्रदर्शनाच्या उद्दिष्टांना धरून आहे.

मॅजिक्रेटच्या एएसी वॉल पॅनल्सने पारंपरिक भिंती बांधकाम पद्धतींमध्ये क्रांती घडविली असून, आता १६ पट अधिक वेगाने भिंतीचे बांधकाम करता येणे शक्य झाले आहे. यात वापरण्यात आलेल्या सुपीरियर थर्मल आणि साउंड इन्सुलेशनमुळे एअर कंडिशनिंगचा खर्च ३० टक्के कमी होणार आहे आणि अधिक आरामदायी वातावरण अनुभवता येणार आहे.

यातील अतुलनीय अग्निरोधक क्षमता तब्बल ४ तास आगीचा सामना करू शकते. ज्यामुळे निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक इमारतींना अधिक सुरक्षा मिळेल. हे पॅनल्स तंत्रज्ञान बुलेट ट्रेन स्टेशन, डेटा सेंटर्स (एसटीटी) तसेच डीएलएफ, लोढा आणि फॉक्सकॉनसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांच्या प्रकल्पांमध्ये यशस्वीरित्या वापरण्यात आले आहे.

भारतातील बांधकाम क्षेत्र वेगाने विकसित होत आहे आणि अधिक कार्यक्षमतेसह शाश्वतता देणाऱ्या तंत्रज्ञानाला स्वीकारत आहे.

बांधकाम पद्धतीचा कायापालट करणाऱ्या एएसी सोल्यूशन्ससारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मॅजिक्रेट या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास सक्षम असल्याचे प्रतिपादन मॅजिक्रेटचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ बन्सल यांनी केले.

कॉन्स्ट्रो २०२५ ही एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनी आहे.

पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनीअरिंग रिसर्च फाउंडेशन (पीईसीआरएफ) द्वारे दरवर्षी याचे आयोजन केले जाते. हे प्रदर्शन २१,०७८ चौरस मीटर क्षेत्रावर आयोजित केले गेले असून, यात ४५० पेक्षा जास्त बूथ आणि १५,००० हून अधिक व्यावसायिक प्रतिनिधींचा सहभाग आहे. या प्रदर्शनीला प्रतिष्ठित औद्योगिक संघटनांचे सहकार्य आहे तर, नवी दिल्लीस्थित आयटीपीओ ची देखील मान्यता प्राप्त आहे.

# थोडक्यात

## गोपाळ विठ्ठल यांची जीएसएमए बोर्डाच्या कार्यवाहक अध्यक्षपदी नियुक्ती



गुरुग्राम (आरंभ पर्व) : टेलिफोनिकाचे अध्यक्ष व मुख्ये कार्यकारी अधिकारी जोस मारिया अल्वारेस-पॅलेट यांनी कंपनीतून राजीनामा दिल्यानंतर भारती एअरटेलचे उपाध्यक्ष व व्यकवस्थाईपकीय संचालक आणि जीएसएमएचे उपाध्यक्ष गोपाळ विठ्ठल यांची जीएसएमए बोर्डाच्या कार्यवाहक अध्यक्षपदी नियुक्तीथ करण्यात आली आहे. या राजीनाम्यामुळे, ते आता जीएसएमएच्या अध्यक्षपदी राहू शकत नाहीत. गोपाळ यांची अलीकडेच जीएसएमए बोर्डाच्या उपाध्यक्षपदी पुन्हा निवड झाली. त्यांनी २०१९-२०२० या कालावधीसाठी मंडळाचे प्रमुख सदस्य म्हणूनही काम केले आहे. जीएसएमए जागतिक दूरसंचार उद्योगाचे प्रतिनिधित्व करते, जेथे जगभरातील दूरसंचार परिसंस्थेतील ११०० हून अधिक कंपन्या आहेत, ज्या मध्येव दूरसंचार सेवा प्रदाते, हँडसेट व डिवाईस उत्पीदक, सॉफ्टवेअर कंपन्या, उपकरणे प्रदाते आणि इंटरनेट कंपन्या, तसेच संलग्ना उद्योग क्षेत्रातील संघटनांचा समावेश आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : चांडोली (ता.खेड) येथे श्री पांडुरंग आगमनानिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ४१ वे वर्ष असून त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती चांडोलीचे माजी सरपंच तथा सप्ताह समितीचे अध्यक्ष सोपानराव वाघमारे , सचिव नामदेव वाघमारे (गुरुजी) यांनी दिली. या सप्ताहाचा प्रारंभ मंगळवार पासून (दि.४ फेब्रुवारी) होणार असून ११ फेब्रुवारी रोजी या सप्ताह कार्यक्रमाची सांगता होणार आहे. कडूस (ता. खेड) येथे प्रतिवर्षी पंढरपूर येथून श्री.पांडुरंग विश्रांतीसाठी काही काळ येतात. त्यांच्या पंढरपूर ते कडूस प्रवासात श्रीपांडुरंगाचे विसाव्याचे ठिकाण म्हणजे खेड तालुक्यातील चांडोली येथे भीमानदी दक्षिणवाहिनी झालेल्या तीरावर असतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यानिमित्त गेल्या अनेक वर्षांपासून हा सप्ताह चालत आलेला आहे. असे विश्वस्त चिकाशेठ वाघमारे व बाळासाहेब सावंत यांनी सांगितले. सप्ताह काळात दररोज पहाटे काकड आरती, सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी नेमाचे भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री प्रसाद, त्यानंतर हरिकीर्तन व हरिजागर आणि अखंड वीनानाद असे कार्यक्रम होत आहेत. या कालावधीत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मोरे (पाबळ), पुंडलीक महाराज नागवडे ( गुनाट- शिरूर ), योगिराज महाराज गोसावी ( पैठण ), मच्छिंद्र महाराज अनभुले (मुंबई), संतोष महाराज बढेकर (धामणी ), पांडुरंग महाराज घुले (देहु), शंकर महाराज शेवाळे (मंचर), पोपट महाराज राक्षे (वेहेळदरा), यांची कीर्तने होणार आहे. तर माघ शुद्ध दशमीला सोमवारी( दि. १९) श्री. पांडुरंग आगमनानिमित्त भीमा नदीतीरावर विठ्ठल मंदिरासमोर सोपान महाराज सानप - शास्त्री ( हिंगोली) यांचे सकाळी कीर्तन होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांसाठी परिसरातील भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट, विठ्ठल रखुमाई ग्रामविकास मंडळ, विठ्ठल रखुमाई जिर्णोद्धार समिती, ब्रम्हेश्वर देवस्थान ट्रस्ट, भैरवनाथ मंदिर ट्रस्ट, विठ्ठल रखुमाई भजनी मंडळ, भैरवनाथ भजनी मंडळ, गुरुदत्त भजनी मंडळ, जय गणेश मंडळ, सम्राट गणेश मंडळ, तिरंगा गणेश मंडळ, ग्रामपंचायत चांडोली आणि समस्त ग्रामस्थ मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुलटेकडी उड्डाणपुलावर दोन दुचाकींच्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू

पुणे (आरंभ पर्व) : दोन दुचाकींच्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना मार्केटयार्ड येथील गुलटेकडी उड्डाणपुलावर घडली. या प्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेल्सन पॉल डिसोझा (वय ५०, रा. ज्ञानेश्वर कॉलनी, कासारवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत डिसोझा यांचा मुलगा गौरीश (वय १९) यांनी स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून अभय जवाहर जयस्वाल (वय ३८, रा. पिंपळे सौदागर) या संशयिताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स २०२५ साठी परीक्षक मंडळाची घोषणा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

४ फेब्रुवारी २०२५डेलॉइट टौश तोहमात्सु इंडिया एलएलपी म्हणजेच डेलॉइट इंडियाने एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स २०२५ साठी परीक्षक मंडळाची घोषणा केली आहे.

या उपक्रमांतर्गत देशभरातील उत्कृष्ट कौटुंबिक उद्योग, अब्जाधीश आणि लवकरच अब्जाधीशहोण्याच्या मार्गावर असलेल्या कंपन्यांच्या योगदानाची दखल घेतल्या जाते. यासह नेतृत्व, दूरदृष्टी आणि प्रगती दर्शवित आपल्या समुदायांसाठी योगदान देत, क्षेत्रीय सीमा ओलांडून राष्ट्रीय स्तरावर प्रभाव निर्माण करणाऱ्या कंपन्यांना यामध्ये सन्मानित केल्या जाते.

एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स २०२५ च्या परीक्षक मंडळामध्ये इन्फोसिसचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि परीक्षक मंडळाचे अध्यक्ष एस. डी. शिबुलाल; स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माजी मुख्य अर्थतज्ज्ञ आणि स्वतंत्र संचालक डॉ. वृंदा जाधीरदार, कॅटामरन व्हेंचर्सचे अध्यक्ष आणि एचडीएफसीचे समिती सदस्य एम. डी. रंगनाथ; आणि डेलॉइटचे वरिष्ठ सल्लागार मनोज कोहली यांचा समावेश आहे. या प्रतिष्ठित व्यक्तींमुळे पुरस्कार सोहळ्याला अद्वितीय कौशल्य आणि सखोल दृष्टिकोन मिळेल जेणेकरून, भारतातील उत्कृष्ट उद्योगांचा सन्मान करण्यासाठी एक पारदर्शक आणि मजबूत मूल्यमापन प्रकिया सुनिश्चित होईल.

विविध उद्योग क्षेत्रांतील प्रतिष्ठित नेते आणि दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींचा एकत्र आण्यांसाठी एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स 2025 च्या परीक्षक मंडळाची निवड अत्यंत काटेकोरपणे करण्यात आली आहे. प्रत्येक परीक्षक सदस्याकडे व्यापक अनुभव, सखोल औद्योगिक ज्ञान आणि भारतातील व्यवसाय यशासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या घटकांची सखोल समज आहे. स्थानिक पातळीपासून तर राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्यासाठी यशस्वी झालेल्या उद्योगांकडे लक्ष वेधून परीक्षक मंडळ रूपांतर, नेतृत्व आणि नवोपक्रम यावर भर देणारी सखोल मूल्यमापन प्रक्रिया सुनिश्चित करेल.

"हे एकमेवाद्वितीय परीक्षक मंडळ पुरस्काराच्या उच्च मानदंड आणि विश्वासार्हतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे हा भारतातील खाजगी क्षेत्रातील उत्कृष्टतेचा खरा महोत्सव ठरतो," असे डेलॉइट प्रायव्हेट,डेलॉइट इंडियाचे भागीदार आणि नेतृत्वकर्ते के. आर. शेखर यांनी सांगितले.

एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स 2025 च्या पर्वाला मिळालेला प्रतिसाद खरोखर उत्साह वाढविणारा आहे.

देशभरातील कंपन्या मोठ्या उत्साहाने यात सहभाग घेत आहेत. हा सकारात्मक प्रतिसाद, विशेषतः महानगरांच्या पलीकडे असलेल्या असामान्य उद्योजकीय प्रवासांना प्रकाशझोतात आणण्याच्या उद्दिष्टाला अधोरेखित करीत आहे. उद्योगांना हा पुरस्कार ही एक संधी वाटतो, जिथे त्यांनी उद्योगाचा कसा विकास केला आणि स्थानिक पातळीवरून राष्ट्रीय ख्यातीपर्यंत आपला कसा प्रवास केला हे दाखवून देऊ शकतात.

खाजगी क्षेत्राच्या विकास आणि उत्कृष्टतेसाठी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा सन्मान करण्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देताना आम्हाला अभिमान वाटतो, असे डेलॉइट इंडियाचे भागीदार धीरज भंडारी म्हणाले.

एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स २०२५ ला उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामध्ये भारतभरातील 200 हून अधिक कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. हे पुरस्कार भारतातील विविध उद्योजकीय बुद्धिमत्तेचा गौरव करतात, विशेषतः ज्यांच्या उद्योगांनी लहान स्तरावरून सुरुवात करीत व्यापक स्तरावर आपला दीर्घकालीन प्रभाव निर्माण केला आहे.

**भारतातील समृद्ध व्यवसायिक क्षेत्रात शाश्वत विकास साधून देखील अनेक वेळा दुर्लक्षित राहणाऱ्या उद्योगांच्या यशोगाथा जगासमोर आणणे हे या पुरस्कार उद्दिष्ट आहे. या पुरस्काराने व्यवसायांना त्यांची विशेष ओळख आणि मान्यता मिळवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. यातूनच सहभागी कंपन्यांना डेलॉइटच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते, जी त्यांची क्षमता वाढवण्यास आणि त्यांच्या संबंधित उद्योगांमध्ये आदर्श म्हणून त्यांचे स्थान निर्माण करण्यास मदत करेल.**

# डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ सुरू करणार

## 'अंनिस'च्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत निर्णय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार समाजात नव्या शैक्षणिक माध्यमातून व्हावा, म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे (अंनिस) 'डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ' स्थापन करून त्याद्वारे विविध ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे, तसेच जादूटोणाविरोधी कायदा राष्ट्रीय पातळीवर व्हावा, यासाठी देशपातळीवर पाठपुरावा करण्याचा ठराव समितीच्या राज्य कार्यकारिणी बैठकीमध्ये झाला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीची बैठक एक व दोन फेब्रुवारीला रत्नागिरीत झाली. त्यासाठी राज्यभरातील १७ जिल्ह्यांतून १२५ अंनिस कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये 'अंनिस'चे जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधान सचिव, राज्य विभागांचे कार्यवाह, राज्य कार्यकारिणीचे सदस्य, सल्लागार मंडळाचे सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ब्राह्मण क्रिकेट लीग : बियास ब्रावोज, शरयू योद्धा, नर्मदा रायडर्स आणि ब्रह्मपुत्रा वॉरियर्स उपांत्य फेरीत दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ब्राह्मण क्रिकेट लीगच्या या वीकेंडमध्ये क्रिकेट चाहत्यांसाठी उत्कंठावर्धक आणि अटीतटीच्या सामन्यांचा अनुभव मिळाला. सर्व सामन्यांत खेळाडूंनी दमदार कामगिरी करत उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन केले.



पहिल्या सामन्यात गंगा सुपर किंग्सने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत १९० धावांचा डोंगर उभा केला. कौस्तुभ देशपांडेने २८ चेंडूत ४२ धावा केल्या, तर सुदर्शन गुणेने १६ चेंडूत ३८ धावा करून संघाला भक्कम आधार दिला. प्रत्युत्तरात रावी रॉयल इगल्सने जोरदार सुरुवात केली. प्रथमेश देशपांडेने ४३ चेंडूत ७३ धावा आणि अभिषेक कौशिकने ३६ चेंडूत ६६ धावा करत संघाला १८.२ षटकांत विजय मिळवून दिला. रावी रॉयल इगल्सकडून स्वानंद भागवत आणि कुणाल बूतकर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

दुसऱ्या सामन्यात मुठा सह्याद्री शिलेदारने २० षटकांत १५२ धावा केल्या. निखिल नसेरीने ५० चेंडूत ५६ धावा तर सुयश भटने २६ चेंडूत ४४ धावा केल्या.

शरयू योद्धा ने हे आव्हान १६.२ षटकांतच पूर्ण करत सेमी फायनलमध्ये प्रवेश केला. सिद्धार्थ परचुरेने ४१ चेंडूत ५३ धावा आणि प्रणव नातूने १७ चेंडूत ३५ धावा केल्या. शरयू योद्धाकडून सिद्धार्थ वैद्यने ३ गडी बाद केले.

तिसऱ्या सामन्यात नर्मदा रायडर्सने १९.५ षटकांत सर्वबाद १४९ धावा केल्या, ज्यात मिहीर ओकने ३३ चेंडूत ५० धावा केल्या. शरयू योद्धाने रोहन दामलेच्या २८ चेंडूत ३८ धावा आणि २ विकेट्स, तसेच रणजित कुलकर्णीच्या ३१ चेंडूत ५० धावांच्या जोरावर चार विकेट्स राखून विजय मिळवला.

चौथ्या सामन्यात ब्रह्मपुत्रा वॉरियर्सने २० षटकांत १६१ धावा केल्या. आयुष्य देवने ४५ चेंडूत ६७ धावा, तर केतन बापट आणि भूषण परांडकर यांनी प्रत्येकी २१ धावा केल्या. रावी रॉयल इगल्सने हृषीकेश आगाशेच्या ३३ चेंडूत ५३ धावा आणि स्वानंद भागवतच्या ३० चेंडूत ४२ धावा तसेच ३ विकेट्सच्या जोरावर १७.५ षटकांत विजय मिळवला.

# प्रीमियम फ्रेंच मेन्सवेअर ब्रॅण्ड सिलिओकडून पुण्यामध्ये नवीन स्टोअरचे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिलिओ या प्रीमियम फ्रेंच मेन्सवेअर ब्रॅण्डने महाराष्ट्रातील पुण्यामध्ये आपल्या नवीन स्टोअरच्या लाँचची घोषणा केली आहे. हे शहरातील ब्रॅण्डचे तिसरे स्टोअर आहे, जे आधुनिक व स्टाइलप्रती जागरूक पुरूषांच्या गरजांची पूर्तता करते. हे स्टोअर 31 जानेवारी 2025 रोजी ग्राहकांसाठी अधिकृतरित्या खुले झाले. विस्तृत 1,825 चौरस फूट जागेवर पसरलेले हे नवीन स्टोअर फॅशन हब म्हणून डिझाइन करण्यात आले आहे, जे प्रीमियम क्लोदिंग व ॲक्सेसरीजची व्यापक श्रेणी देते. हा महत्त्वपूर्ण टप्पा सिलिओच्या भारतातील 68व्या स्टोअरला साजरे करतो, ज्यामुळे देशातील आघाडीचा फॅशन ब्रॅण्ड म्हणून सिलिओची उपस्थिती अधिक दृढ झाली आहे.




ग्राहक सिलिओचे नवीन स्प्रिंग समर 2025 कलेक्शन म्हणून एक्स्प्लोअर करू शकतात, ज्यामध्ये उत्साहवर्धक समर पेस्टल्समधील युरोपियन फ्लेक्स लिनेनची प्रीमियम श्रेणी आहे. कलेक्शनमध्ये प्रिंटेड लिनेन शर्टस्, लिनेन कार्गोज आणि बर्मुडा आहेत. या प्रत्येक ॲक्सेसरीज पर्यावरणापूरक डिझाइनसह तयार करण्यात आल्या आहेत. ग्राहक सिलिओच्या नाविन्यपूर्ण डेनिम्स, कार्गोज व प्रीमियम शर्टसच्या नवीन श्रेणीसह मिक्स-मॅच देखील करू शकतो. या उत्साहामध्ये अधिक आनंदाची भर म्हणजे हे स्टोअर अधिकृतरित्या परवाना असलेल्या मर्चंडाइजची अद्वितीय श्रेणी देईल, ज्यामध्ये नरूटो, डेमन स्लेयर व ब्लीच यांसारख्या लोकप्रिय फ्रँचायझींकडून प्रेरित ॲपरलचा समावेश आहे. या लाँचबाबत मत व्यक्त करत सिलिओ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्येन मोमया म्हणाले, सिलिओमध्ये आमचा विश्वास आहे की, शॉपिंग म्हणजे उत्तम फॅशनचा शोध घेण्यासोबत आनंददायी अनुभव आहे. पुण्यामध्ये आमच्या तिसऱ्या स्टोअरसह आम्ही विचारपूर्वक डिझाइन केलेली स्पेस सादर करत आहोत, जेथे पुरूष त्यांच्या जीवनशैलीला साजेशा समकालीन, प्रभावी फॅशनला एक्स्प्लोअर करू शकतात. आमच्या प्रीमियम स्प्रिंग समर 2025 कलेक्शनपासून विशेष परवानाधारक मर्चंडाइजपर्यंत हे स्टोअर क्यूरेटेड श्रेणी देते, ज्यामध्ये स्टाइल, आरामदायीपणा व अपवादात्मक दर्जाचे संयोजन आहे. आम्ही पुणेकरांना पुढाकार घेत सिलिओसह फ्रेंच फॅशनचा अनुभव घेण्याचे आवाहन करतो. सिलिओ पुण्यातील फॅशनप्रेमी पुरूषांना उत्साहित शॉपिंग अनुभवासाठी नवीन स्टोअर एक्स्प्लोअर करण्याचे आवाहन करते. तुम्हाला कॅज्युअल, क्लासिक किंवा आकर्षक लुक पाहिजे असल्यास सिलिओचे नवीन कलेक्शन प्रत्येक स्टाइलसाठी परिपूर्ण असण्याची खात्री देते.

**स्टोअरचा पत्ता : पहिला मजला, एफ-03, सिलिओ फिनिक्स मार्केट सिटी, सर्व्हे क्र. 207, बाकेरमागे, हयात अँड इबिस हॉटेलजवळ, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र 411104.**

**सिलिओ विषयी: सिलिओ हा फ्रेंच मेन्सवेअर ब्रॅण्ड आहे आणि 50 देशांमध्ये त्याचे 1100 स्टोअर्स आहेत. हा ब्रॅण्ड भारतामध्ये आपली 68 स्वतंत्र स्टोअर्स आणि अग्रगण्य डिपार्टमेंटल स्टोअर्समधील 700 हून अधिक शॉप्स यांच्या माध्यमातून कॅज्युअल वेअर, डेनिम वेअर आणि स्मार्ट वर्क वेअर प्रकारातील कपड्यांची नवनवी आंतरराष्ट्रीय उत्पादनश्रेणी भारतात आणतो. नव्या प्रवाहांचा अर्थ लावत स्मार्ट आणि चालू काळासाठीचे मेन्सवेअर पुरविणे यात हा ब्रॅण्ड निपुण आहे. पुरुषाच्या आयुष्यातील विविध प्रसंगांचा विचार करून तयार केलेले कलेक्शन्स सादर करत सिलिओ पुरुष ग्राहकांना सहजसाध्य शैली उपलब्ध करून देते.**

# रॉयल स्टॅग बूम बॉक्सने निर्माण केला ठाणे, मुंबई येथे अभूतपूर्व अनुभव

- **अरमान मलिक, निकिता गांधी, इक्का आणि डीजे योगी यांचे दमदार सादरीकरण**
- **चार शहरांच्या दौऱ्यावर निघालेले, सीयाग्रामचे रॉयल स्टॅग बूमबॉक्स - द ओरिजिनल साउंड ऑफ जनरेशन लार्ज - कला, संस्कृती आणि गेमिंग अनुभवांसह बॉलीवूडच्या सुरांचे आणि हिप-हॉप बीट्सचे मिश्रण.**




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'लिव्हिंग इट लार्ज' या भावनेचा उत्सव साजरा करत, सीयाग्रामच्या रॉयल स्टॅगने १ फेब्रुवारी ला ठाणे, मुंबई येथील आनंद नगरातल्या टीएमसी ग्राउंड येथे एका शानदार शोसह रॉयल स्टॅग बूमबॉक्सच्या बहुप्रतिक्षित तिसऱ्या आवृत्तीची सुरुवात केली. या पूर्वीच्या सादरीकरणावर अभूतपूर्व मात करीत यंदाचा संगीत महोत्सव आणि गेमिंग मनोरंजनाच्या सर्वोत्तम चमूने एकाच व्यासपीठावरील या सीमा वाढविल्या.

भारतातील काही प्रसिद्ध कलाकारांच्या सादरीकरणाचा अनुभव घेण्यासाठी हजारो उत्साही तरुण एकत्र जमल्याने ही सायंकाळ अविस्मरणीय ठरली. या कार्यक्रमाने काळजाचा ठाव घेणारे संगीत, मनमोहक सादरीकरण आणि अतुलनीय उर्जेने ही सायंकाळ अविस्मरणीय ठरली.

टीएमसी ठाण्याचे विस्तीर्ण मैदान तल्लीन कला प्रदर्शने, क्युरेटेड फूड एक्सपिरीयन्स आणि इंटरॅक्टिव्ह झोनने अक्षरशः जिवंत झाले.

यातून संगीताव्यतिरिक्त एक बहु-संवेदी उत्सव निर्माण झाला. या अविस्मरणीय सायंकाळची सुरुवात डीजे योगी यांच्या रॉकिंग सेटने झाली. डीजे योगीने रात्रीसाठी परिपूर्ण वातावरण तयार केले. रॅप आयकॉन इक्काने त्यात आणखी जोश भरत एकाहून एक बीट्स सादर केले. त्यानंतर दमदार परफॉर्मर निकिता गांधी आणि तिच्या टीममधील बहुमुखी गायकीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

ग्रँड फिनालेमध्ये संगीतकार अरमान मलिक यांनी एक शानदार समारोप सादर केला. जो विविध संगीत शैलींच्या वैशिष्ट्यपूर्ण मिश्रणाला परिपूर्णपणे मूर्त रूप देऊन गेला. या सादरीकरणाने नवी पिढी आणखी उत्साहाने चार्ज होत अविस्मरणीय अनुभव मिळवून गेली. या कार्यक्रमात श्रीमन लेजेंड आणि रॉकनी यांच्यातील रोमांचकारी ईएएफसी गेमिंग फेस-ऑफ स्पर्धा देखील स्टेजवर थेट दाखवण्यात आली.

गायक-गीतकार अरमान मलिक म्हणाले, "लोकांशी एकरूप होत संगीत हा नेहमीच माझ्यासाठी उत्तम मार्ग राहिला आहे. तुम्ही कुठून आलेले असाल, कोणतीही भाषा बोलत असला तरी संगित ही एकमेव भाषा तुम्हाला जोडते. गेल्या वर्षी देशभरात रॉयल स्टॅग बूमबॉक्ससाठी सादरीकरण करणे हा माझ्यासाठी देखील अविस्मरणीय अनुभव होता. प्रत्येक शहरातील गर्दीतून आलेली ऊर्जा खरोखरच उत्साहवर्धक आहे.

मला अद्भुत लोकांना भेटण्याची, वेगवेगळ्या संस्कृतींचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. संगीत हेच माध्यम सर्वांना एकत्र आणते हे प्रत्यक्ष पाहण्याची, अनुभवण्याची संधी देखील यातून मला मिळाली. मुंबईत झालेल्या एका अविश्वसनीय कार्यक्रमानंतर, गुरुग्राममध्ये हा अनोखा संगीत अनुभव देताना मी रोमांचित झालो आहे."

गायिका निकिता गांधी म्हणाली, "वैयक्तिकरित्या माझ्यासाठी, रॉयल स्टॅग बूमबॉक्स नेहमीच अभिनव प्रयोग आणि संगीताद्वारे सीमा ओलांडण्याचा अनुभव राहिला आहे. वेगवेगळ्या सादरीकरणातील शैलींचे मिश्रण किंवा लाईव्ह परफॉर्मन्स देणारे हे व्यासपीठ सर्जनशीलतेची मर्यादा ओलांडण्यास अनुमती देते. मुंबईतील रॉयल स्टॅग बूमबॉक्समध्ये सादरीकरण करणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता आणि मी गुवाहाटीमधील माझ्या पुढील कार्यक्रमासाठी उत्सुक आहे."

कलाकार इक्का म्हणाल्या," प्रत्येक कलाकाराला त्यांचा अनोखा जादुई आवाज आणि उत्साह दाखवून देण्याची संधी देणे हे रॉयल स्टॅग बूम बॉक्सचे अनोखे आणि खास वैशिष्ट्य आहे. हे खरोखरच अनोखी कथा, थेट काळजाचा ठाव घेणारे बीट्स आणि अविस्मरणीय क्षणांचे मिश्रण आहे. मुंबईतील अभूतपूर्व सादरीकरणानंतर मी गुवाहाटीला तीच ऊर्जा आणि उत्साह निर्माण करण्यासाठी उत्साहित झालो आहे." डीजे योगी म्हणाले, "रॉयल स्टॅग बूम बॉक्स हे संगीताद्वारे गर्दीत उत्साह पेरण्यात आणि त्यात जिवंतपणा आणण्यात मोलाचे व्यासपीठ आहे. बीट्स आणि शैलींचे मिश्रण करून एक उर्जा निर्माण करणारे वातावरण तयार करणे हे एक डीजे म्हणून, माझे कर्तव्य आहे. या वर्षी तीच उर्जा निर्माण करण्यात आणि कार्यक्रमाला एका भव्य अविस्मरणीय अनुभवात रूपांतरित करताना मी उत्साहित झालो आहे. उत्सागाला सुरुवात करून अविश्वसनीय कामगिरीसाठी लय सेट करणे हा माझ्यासाठी देखील एक परिपूर्ण थरार होता."

गेमिंग युट्यूबर श्रीमन लेजेनडी म्हणाला, "एक गेमर आणि निर्माता म्हणून, या अविश्वसनीय संधीसाठी अँपव्हर्स डीएमआय पल्ससोबत सहयोग करण्यास आणि रॉयल स्टॅग बूमबॉक्सचा भाग होण्यास मी खूप उत्सुक आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्समधील लाइव्ह गेमिंग फेस-ऑफने अनुभवाला एक रोमांचक आयाम दिला आहे. अशा उपक्रमांनी युवा-केंद्रित मनोरंजनाचे भविष्य सिद्ध होत आहे. रॉकनी म्हणाले, "रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आपल्याला उत्साहित करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा उत्सव आहे. गेमिंग, संगीत आणि गर्दीची ऊर्जा. श्रीमन लेजेंडसोबत थेट स्पर्धा करणे महाकाव्य होते. उर्जा निर्माण करणारे वातावरण माझ्यासोबत कायमचे स्मरणात राहील."

पेर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य विपणन अधिकारी आणि जागतिक व्यवसाय विकास प्रमुख कार्तिक मोहिंद्र म्हणाले, "संगीत ही सार्वत्रिक भाषा आहे. विशेषतः थेट सादरीकरणाद्वारे लोकांना एकत्र जोडून त्यांना अनोख्या जादूई क्षणांचा साक्षिदार अनुभव देण्यात हा कार्यक्रम उल्लेखनीय शक्ती देणारा आहे. रॉयल स्टॅग हे संगीताला त्याच्या युवा उत्कटतेचा प्रमुख आधारस्तंभ म्हणून साजरे करतो.

आता, आम्ही रॉयल स्टॅग बूमबॉक्सच्या तिसऱ्या आवृत्तीचे अनावरण करत असताना, हे व्यासपीठ एका रोमांचक नवीन साउंडस्केपसह अनुभव उंचावण्यासाठी सज्ज आहे. ज्यामध्ये हिप-हॉपच्या धडधडणाऱ्या बीट्ससह बॉलीवूडच्या सुरांचे मिश्रण असेल. कला आणि सांस्कृतिक अनुभवांसह, लिव्हिंग इट लार्जच्या ब्रँड तत्वज्ञानाचे खरोखर उदाहरण दिले जाईल."

**ईएनआयएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी यतीश मेहर्षी म्हणाले, "संगीताच्या जादूद्वारे लोकांना एकत्र जोडणे हे रॉयल स्टॅग बूमबॉक्सचे वैशिष्ट्य आहे. येथे नावीन्य संस्कृतीला भेटते आणि परंपरा आधुनिक वातावरणात अखंडपणे मिसळते. विविधतेचा उत्सव साजरा करणाऱ्या आणि अविस्मरणीय क्षण निर्माण करणाऱ्या अशा खास गोष्टीवर सहयोग करण्यास आम्ही उत्सुक आहोत. ही आवृत्ती देशभरातील संगीत प्रेमींना आयुष्यभर जपून ठेवतील अशा ऊर्जा, आनंद आणि आठवणी प्रदान करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे आहे." लाईव्ह इव्हेंट्सना पूरक म्हणून, ही प्रॉपर्टी स्टुडिओमधील सहयोगांची मालिका देखील तयार करेल. ज्यामध्ये मधुर आणि हिप-हॉप घटकांचे मिश्रण करणारे मूळ ट्रॅक तयार केले जातील. जे डिजिटल प्लॅटफॉर्मवर सोबत व्हिडिओसह सिंगल्स म्हणून रिलीज केले जातील. सीयाग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा भारताच्या वैविध्यपूर्ण संगीत संस्कृतीचा उत्सव आहे. जो प्रतिष्ठित कलाकार आणि नवीन प्रतिभांना एकत्र आणून सुरांचे गतिमान मिश्रण तयार करतो. गेल्या काही वर्षांपासून संगीत ब्रँडसाठी एक प्रमुख ग्राहक सहभाग आधारस्तंभ आहे. हे प्लॅटफॉर्म हिप-हॉपच्या उर्जेसह बॉलीवूडच्या कालातीत सुरांना धाडसीपणे एकत्र आणते. आजच्या पिढीतील जनरेशनला नव्या उर्जेसह मूळ आवाज बुलंद करते. महोत्सवाचे अनोखे स्वरूप एक वेगळे ध्वनी तयार करते जे आजच्या तरुणाईशी प्रतिध्वनीत होते.**

# नवमूत्रमार्ग, कृत्रिम स्नायू प्रस्थापित करून तरुणीचे जीवन आनंदी व पूर्ववत

## पुण्यातील युरोकूल-कुलकर्णी युरोसर्जरी इन्स्टिट्यूट व उमरजी हॉस्पिटलमध्ये देशातील पहिलीच क्लिष्ट शस्त्रक्रिया व प्रसूती यशस्वी

- जागतिक कर्करोग दिनी डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. चिन्मय उमरजी यांची माहिती
- कर्करोगाबत जागरूक राहण्याचे आवाहन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"ऑटो इम्यून ट्युमरमुळे लघवीचा मार्ग गमवावा लागलेल्या अठ्ठावीस वर्षीय तरुणीला नवमूत्रमार्ग, कृत्रिम स्नायू प्रस्थापित करून तिचे जीवन आनंदी व पूर्ववत करण्यात पुण्यातील डॉक्टरांना यश आले आहे. कृत्रिम मूत्रमार्ग बसवल्यानंतर तिची गळणारी लघवी थांबलीच; पण तिचे लग्न होऊन ती गरोदर राहिली व नुकताच तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला आहे. या तरुणीचे 'स्त्रीत्व' पूर्ण झाल्याने तिच्यासह पती व आईच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू तरळले," अशी माहिती युरोकूल-कुलकर्णी युरो सर्जरी इन्स्टिट्यूटचे संस्थापक व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युरोलॉजिस्ट डॉ. संजय कुलकर्णी यांनी दिली.

बाणेर येथील 'युरोकूल'मध्ये झालेल्या पत्रकार परिषदेवेळी जगातील पहिल्या महिला लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, प्रसूतीरोग तज्ज्ञ व उमरजी हॉस्पिटलचे चिन्मय उमरजी, युरोलॉजिस्ट डॉ. पंकज जोशी, डॉ. अमित होसमनी, डॉ. श्रेयस भद्रनवार, कर्करोगतज्ज्ञ डॉ. उदय चंदनखेडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभय चौधरी, बाणेर-बालेवाडी मेडिको असोसिएशनचे संस्थापक डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.

डॉ. संजय कुलकर्णी म्हणाले, "मुंबईची अंजली ही तरुणी २०२२ मध्ये युरोकूलमध्ये आली. तिची लघवीची जागा आणि योनी मार्ग यादरम्यान गाठ तयार झाली होती. तिचा मूत्रमार्ग व त्यावरील मांस विरघळून गेल्याने लघवीवर नियंत्रण नव्हते. सतत लघवी गळत असल्याने दिवसात तिला किमान १०-१२ डायपर वापरावे लागत होते. अँटिबायोटिक व इम्युनोथेरपी दिल्याने तिचा लघवी मार्ग निकामी झाला होता. तिचे भविष्यातील जीवन अंधकारमय झाले होते. मात्र, तिला आशेचा किरण दाखवत आम्ही तिच्या दोन शस्त्रक्रिया केल्या. तपासणीअंती तिचा लघवी मार्ग बंद झाल्याचे आढळले. त्यानंतर एप्रिल २०२२ पहिली शस्त्रक्रिया केली. योनीभागातील कातडी काढून त्यापासून मूत्रमार्ग तयार केला. त्यामुळे लघवी मार्गातून तिला लघवी होऊ लागली. परंतु लघवीवर तिचे नियंत्रण नव्हते. सहा महिन्यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये पुन्हा दुसरी शस्त्रक्रिया केली आणि लघवी मार्ग व योनीमार्गाच्या मधोमध 'आर्टिफिशियल युरीनरी स्प्रिंक्टर' हे अत्याधुनिक उपकरण बसवले. त्यानंतर तिची लघवी सुरळीत झाली. या दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर तिचे लग्न झाले. ती गरोदर राहिली आणि चार दिवसांपूर्वीच तिने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे."

डॉ. चिन्मय उमरजी म्हणाले, "अंजली गरोदर राहिल्यानंतर डॉ. कुलकर्णी व डॉ. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली उमरजी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. 'आर्टिफिशियल युरिनरी स्प्रिंक्टर' बसवल्याने प्रसूती जिकिरीची होती. त्यामुळे सुरवातीपासूनच आम्ही विशेष खबरदारी घेतली. सोनोग्राफी व प्रगत मशीनद्वारे बाळाची व आईची तपासणी करून सिझरियन पद्धतीने ही प्रसूती करण्यात आली. प्रसूती करताना स्प्रिंक्टरला धक्का लागणार नाही व तिला त्रास होणार नाही, याची काळजी घेतली. आता बाळाची आई सुखरूप असून, जवळपास तीन किलो वजनाचे बाळ सुदृढ अवस्थेत आहे. अंजलीसह त्यांचे पती व आई यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून कृतार्थ झालो आहोत."

डॉ. पंकज जोशी यांनी 'आर्टिफिशियल युरिनरी स्प्रिंक्टर' शस्त्रक्रियेची माहिती दिली. या शस्त्रक्रियेमुळे अंजलीला नवे आयुष्य मिळाले आहे. तिचे आयुष्य पूर्ववत झाले असून, लग्न व मातृत्व या दोन्हीही सहजपणे झाल्याने दोन वर्षांपूर्वी निराश अवस्थेत असलेल्या अंजली व तिच्या आईंचा आनंद गगनात मावत नाही. प्रसूती झाल्यानंतर व आपल्या नातवाला हातात घेतल्यानंतर तिच्या आईंनी कडाडून मारलेली मिठी आणि ढाळलेले आनंदाश्रू आजवर केलेल्या कामाची पावती आहे."

डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी स्तनाचा कर्करोगाविषयी प्रतिबंधात्मक काळजी घेण्याबाबत सांगितले. महिलांनी चाळिशीनंतर मॅमोग्राफी करावी. तसेच स्तनांची स्वतःच्या हाताने नियमित तपासणी करावी. गाठ लागली, तर लागलीच डॉक्टरांशी भेटून घ्यावे, असे त्यांनी नमूद केले.

### डॉक्टरांनी माझ्या मुलीचे जीवन सावरले

अंजुषाची आई व पती यांनीही व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे संवाद साधला. माझ्या मुलीला झालेल्या आजाराने खचून गेलो होतो. दिवसातून दहावेळा डायपर बदलावे लागे. तसेच सततच्या लघवीच्या तिला त्वचेचेही आजार होत होते. तिचे लग्न होईल की नाही, अशी शंका होती. मात्र, डॉ. संजय कुलकर्णी यांच्याकडे उपचारासाठी आलो आणि आशेचा किरण दिसला. माझ्या मुलीचे आयुष्य त्यांनी पुन्हा उभारले. तिच्या दोन्ही शस्त्रक्रिया, योग्य गर्भधारणा व प्रसूती करणाऱ्या डॉक्टरांचे पथक आमच्यासाठी देवासमान आहे. आम्ही देव पाहिला नाही; पण माझ्या पतीवर डॉक्टरांनी केलेले उपचार ईश्वरी आशीर्वादच आहे. माझी पत्नी आणि बाळ दोघांना सुखरूप पाहून माझे मन भरून आले आहे.

### कर्करोगाबाबत जनजागृती हवी

कर्करोगतज्ज्ञ डॉ. उदय चंदनखेडे यांनी कर्करोगाची सद्यस्थिती सांगतानाच त्याचे प्रकार, कारणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सांगितले. कर्करोग हा जगातील मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण बनत असून, कर्करोगाबाबत जनजागृती गरजेची आहे. नऊपैकी एक व्यक्ती कॅन्सरग्रस्त असतो. दरवर्षी १० दशलक्ष लोकांचा कॅन्सरमुळे मृत्यू होतो. बदलत्या जीवनशैलीमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले असून, त्याचे योग्यवेळी निदान झाले, तर त्यावर उपचार करणे शक्य आहे. युरोकूल हॉस्पिटलमध्ये सर्व सोयीसुविधांनी युक्त तपासणी व उपचार केले जात आहेत.



## थोडक्यात

### शेअर बाजारात चांगल्या परताव्याच्या आमिषाने दोघांची फसवणूक




**पुणे (आरंभ पर्व) :** सायबर चोरट्यांकडून नागरिकांना शेअर बाजारात चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करण्याच्या घटना सुरूच आहेत. सायबर चोरट्यांनी येरवडा आणि कोथरूड परिसरातील दोघांची ६७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत वडगाव शेरीतील सनसिटी परिसरातील एका ५७ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर मागील नोव्हेंबर महिन्यात संदेश पाठविला. जादा पैशांच्या आमिषाने तक्रारदाराने सायबर चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी ४७ लाख ४३ हजार रुपये जमा केले. परंतु चोरट्यांनी त्यांना परतावा दिला नाही. पुढील तपास पोलिस निरीक्षक पल्लवी मेहेर करीत आहेत. तसेच, कोथरूडमधील गांधी भवन परिसरातील एका ४८ वर्षीय व्यक्तीला टेलिग्रामच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवणुकीबाबत लिंक पाठवली. त्यानंतर सायबर चोरट्यांनी जादा पैशांचे आमिष दाखवून २९ लाख ३५ हजार रुपयांना गंडा घातला. याप्रकरणी कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने करीत आहेत.

## कार्तिक आर्यनने 'इंस्टॅक्स वाईड इव्हो' लाँच केला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

इमेजिंगमधील आघाडीची कंपनी असलेल्या फुजिफिल्म इंडियाने (FUJIFILM India) मंगळवारी (ता. ४) युवा वर्गातील लोकप्रिय अभिनेता आणि Fujifilm इंडियाच्या इन्स्टॅक्सचा ब्रँड ॲम्बेसेडर कार्तिक आर्यन याच्या उपस्थितीत हाय-एंड हायब्रिड इन्स्टंट कॅमेरा "इंस्टॅक्स वाईड इव्हो (वाईड इव्हो) दाखल केला. जागतिक स्तरावर यशस्वी झालेल्या इंस्टॅक्स मिनी इव्होनंतर कंपनीने "वाईड इव्हो" हा डबल-कार्डच्या आकाराच्या वाईड फॉरमॅट फिल्मशी सुसंगत कॅमेरा आणला आहे. "वाईड इव्हो" वापरकर्त्यांना कॅमेऱ्याच्या मागील बाजूस असलेल्या एलसीडी मॉनिटरवर पाहून फोटो काढण्याची आणि प्रिंट करण्यासाठी त्यांचे आवडते शॉट्स निवडण्याची सुविधा देतो. तसेच, तो स्मार्टफोन प्रिंटर म्हणून वापरले जाऊ शकतो. यात "मॅजेन्टा" आणि "मोनोक्रोम" असे दहा लेन्स इफेक्ट्स तसेच "लाइट लीक" ते "कलर ग्रेडियंट" असे दहा फिल्म इफेक्ट्स आहेत. या दोन प्रकारचे इफेक्ट्स एकत्र करून "१०० शूटिंग इफेक्ट्स" तयार करता येतात. शिवाय, या श्रेणीत पहिल्यांदाच, लेन्स इफेक्ट्समध्ये "डिग्री कंट्रोल" फंक्शन देण्यात आले आहे, जे वापरकर्त्यांना प्रकाशाची तीव्रता आणि रंग वर्गीकरण यासारखे प्रभाव १०० पातळ्यांमध्ये समायोजित करण्याची परवानगी देते, त्यामुळे आपल्या अभिव्यक्तीनुसार ते सक्षम होतात. याव्यतिरिक्त, अधिक प्रभावी प्रिंटसाठी फोटो फ्रेमची "फिल्म स्टाइल" आणि विस्तृत श्रेणीसह डायनॅमिक शॉटसाठी अनुमती देणारा "वाइड अँगल मोड", वाइड फॉरमॅट फिल्मचे आकर्षण आणखी वाढवतो. "१०० शूटिंग इफेक्ट्स", "डिग्री कंट्रोल", "फिल्म स्टाइल" आणि "वाइड अँगल मोड" यांच्या मिलाफातून.

## मानवतेचे गीत गाण्याची गरज - डॉ. श्रीपाल सबनीस

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

जगाला अशांततेच्या धोक्यात टाकण्याचे काम साम्राज्यवादी व भांडवलशाही महासत्तांचे सुरू असून जगातली मानवता भयभीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वाच्या शांततेचा नकाशा तयार करायचा असेल तर भारताची सर्वधर्मीय परंपरा व मानव कल्याणाचा विचार एकत्र करून मानवतेचे गीत गाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सबनीस पुढे म्हणाले की स्वातंत्र्याने माणसाला आत्मभान आणि माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. सर्वधर्मांची एकात्मता स्वातंत्र्याला अपेक्षित आहे. मात्र जातीधर्मात विभागलेला समाज पाहता ती एकवाक्यता दिसत नाही. समाजात दुर्मीळ राष्ट्रभक्ती, मूल्यांचा ऱ्हास, महापुरुषांचा पराभव आणि सामाजिक परिस्थिती मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. सध्याच्या काळात कोणताच राजकीय पक्ष समर्थ वाटत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नव्या पिढीने लोकशाही मजबूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर या महापुरुषांमध्ये वैचारिक मतभेद होते. परंतु देश म्हणून आपण एक आहोत हा संदेश त्यांनी दिला. आजचे राजकीय पक्ष एकमेकांचे शत्रू असल्यासारखे वागतात हा लोकशाहीला धोका आहे. ते पुढे म्हणाले की अहिंसा हे संस्कृतीच्या विकासाचे विश्वात्मक सूत्र आहे आणि त्याचे अधिष्ठान गांधीवादात आहे. महापुरुषांच्या संस्कारांची, विचारांची पेरणी कुटुंबातून होणे गरजेचे असून पालकांचा अभ्यास नसेल तर मुलांचे भविष्य चांगले घडणार नाही. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ते हिंदूंचे स्वराज्य होते; हिंदुत्ववाद्यांचे नव्हे. इतिहास हा जातीयवादाचा बळी ठरला असून नव्या पिढीने जातीच्या अंगाने इतिहासाची मांडणी नाकारावी असे त्यांनी सांगितले.

सांस्कृतिक महाराष्ट्राचे पुण्य या राजगुरुनगरच्या भूमीला असून साहेबराव बुट्टेपाटील हे या मातीचे सुपुत्र व संतत्व महापुरुष होते असा गौरव त्यांनी केला. माणसाचे जीवन समृद्ध करण्यासाठी व्याख्यानमाला आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गणेश धुमाळ, परिचय प्रा. प्रवीण कारले आणि आभार डॉ. उन्मेश जगताप यांनी मानले.

# मराठी उद्योजक ग्लोबल होताहेत ही आनंदाची बाब : उद्योगमंत्री

### मराठी उद्योजक घडवण्याचे सॅटर्डे क्लबचा उपक्रम प्रशंसेस पात्र : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी उद्योजक गेल्या काही वर्षांमध्ये जगभरात आपल्या कार्यकर्तृत्वाचा डंका वाजवत आहेत. दाओससारख्या ठिकाणी जाऊन मराठी उद्योजक आपले औद्योगिक करारमदार करीत आहेत. मराठी उद्योजक आता ग्लोबल होत असून, ही अतिशय आनंदाची बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले.



सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या वतीने उद्योग दिंडी उपक्रम आयोजित करण्यात आला. ही उद्योग दिंडी श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आळंदी येथून निघाली असून, ती पुढे पंढरपूरला पोहोचणार आहे. यानिमित्ताने पुण्यातील बावधनमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण मराठमोळ्या वातावरणात मराठी उद्योजकांच्या मांदियाळीचे दृश्य फारच मनमोहक होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे संस्थापक महादेवराव भिडे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या उदघाटनाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. या वेळी सॅटर्डे क्लबचे चेअरमन अशोक दुगाडे, सेक्रेटरी जनरल सुहास फडणीस, डेप्युटी सेक्रेटरी जनरल केदार साखरे, कौन्सिल ऑफ ॲडव्हायजर संतोष पाटील, प्रदीप ताम्हाणे, रवींद्र प्रभुदेसाई, सुरेश हावरे, विजय परांजपे, रिजन हेड (पुणे वेस्ट) विभावरी ब्राह्मणकर, रिजन हेड पुणे सेंट्रल रोहित केसकर यांच्यासह सॅटर्डे क्लबचे पदाधिकारी तसेच मराठी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, मराठी उद्योजक-व्यावसायिकांना प्रगतीसाठी मदत करणे सॅटर्डे क्लबचे कार्य खरंच खूप अभिनंदनीय आहे, कारण असं म्हटलं जातं की, मराठी माणसाला व्यवसायापेक्षा नोकरी अधिक प्रिय असते. परंतु तुम्ही हा समज खोडून काढला आहे.

नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारा मराठी उद्योजक घडवण्याचे प्रयत्न हे खरंच प्रशंसेस पात्र आहेत. मराठी उद्योजकांना घडवण्याच्या तुमच्या या प्रयत्नांना राज्य सरकार नेहमीच योग्य ते सहकार्य करेल, असे मी या ठिकाणी मंत्री म्हणून ठामपणे सांगतो.

याप्रसंगी बोलताना उदय सामंत म्हणाले की, गेल्या दोन-अडीच वर्षांत आम्ही राज्यात ३२ हजार नवे उद्योजक तयार केले. यातून मोठ्या प्रमाणात राज्यात एकीकडे गुंतवणूक वाढली तर दुसरीकडे रोजगारवृद्धी देखील झाली. येत्या काळात राज्यात १५ लाख कोटी रुपयांची विदेशी गुंतवणूक येणार आहे.

या गुंतवणुकीत मराठी उद्योजकांनी सहभागासाठी तयार रहावे. महाराष्ट्रातून जे मराठी उद्योगपती दुसऱ्या राज्यांमध्ये आपला उद्योग नेणार होते, ते आम्ही थांबवले आणि त्यांना राज्यातच विस्तार करण्याची विनंती केली. त्यामुळे राज्यात मोठी गुंतवणूक वाढली आहे. उद्योगांसाठी राज्य शासन रेड कार्पेट आंथरून स्वागत करीत आहे. सरकार आणि उद्योगांनी हातात हात घालून काम केल्यास राज्याचा जोरदार विकास होईल.

मी उद्योगमंत्री असल्यापासून गेल्या अडिच वर्षांत मी उद्योगांना ९ हजार कोटी रुपयांचा इन्सेंटिव्ह वाटला आहे, तसेच आणखी १४ हजार कोटींचे वाटप उद्योगांना करणार असल्याची माहिती सामंत यांनी या वेळी दिली.

यानंतर कार्यक्रमात एक पॅनेल डिस्कशन आयोजित करण्यात आले. यामध्ये मालपाणीज् बेकलाईट चे व्यवस्थापकीय संचालक सचिन मालपाणी, पितांबरीचे एमडी रवींद्र प्रभुदेसाई, मॅरिगोल्ड बॅन्क्वेट्सचे संचालक शंतनू देशपांडे, तसेच मुंबईच्या सुप्रसिद्ध उद्योजिका पाटील काकी उपस्थित होत्या. सुप्रसिद्ध मुलाखतकार सुधीर गाडगीळ व केतन गाडगीळ यांनी पॅनेलमधील सदस्यांशी संवाद साधला.

### अपयशानंतरही जिद्द ठेवल्यास यशस्वी उद्योजक घडतात : सचिन मालपाणी

यावेळी बोलताना सचिन मालपाणी म्हणाले की, आज जरी मी बेकरी उद्योगात एक यशस्वी उद्योजक बनलो असलो, तरी माझा हा प्रवास अत्यंत खडतर असा होता. आमच्या घरातच बेकरी प्रॉडक्ट्सच खाण्याची बंदी होती. त्याला अस्वच्छ बेकरीत बनणारे पदार्थ तसेच घरातील शाकाहारी वातावरण हे कारणीभूत होते. विविध व्यवसायात अपयश आल्यानंतर मी अत्यंत जिद्दीने व्यवसायात कार्यरत राहिलो आणि हायजीनिक आणि शुद्ध शाकाहारी बेकरी प्रॉडक्ट्स बनवण्याचा निश्चय पक्का केला. आज तीच आमची खरी यूएसपी बनली आहे. सुरवातीला या व्यवसायात खूप संघर्ष करावा लागला. सुरवातीला आम्ही हाताने क्रिमरोल तयार करायचो, नंतर परदेशी जाऊन आधुनिक मशीन्स आणल्या. त्यामुळे आज आमचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे व्यवसाय करताना फायनान्सच्या अनंत अडचणी आल्या. परंतु श्रीमंत आणि दिलदार मित्रांमुळे आयुष्यात नेहमी मी यशाकडेच मार्गक्रमण करीत राहिलो. जिद्द कायम ठेवत नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आणि त्यातून यशाचा मार्ग गवसला. आजच्या उद्योजकांनीही आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरल्यास त्यांना नक्कीच यश मिळू शकते, हे मी नक्की सांगेन, असेही सचिन मालपाणी म्हणाले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.